# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 01/03/2023 (गुरूवार) सायंकाळ

---

### दुखापत

**१) पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :— अंतर्गत टेंभरी हिंगणा येथे दिनांक २८/०२/२०२३ चे ७.३० वा. ते ०८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— बिरेंन्द्र महाविर गुप्ता वय ५० वर्श रा वार्ड न टेंभरी यांचे टेंभरी चौकात चहाचे दुकान आहे दुकानात आरोपी नामे— सोनुकुमार देवानंद सिंग, रा. सुरेश ठाकरे याचे घरी किरायाने हा दररोज येतो व चहा उधारीत पितो फिर्यादी हा आरोपीच्या उधारीचे पैसे मागण्याकरिता त्याच्या घरी गेला असता आरोपीच्या वडिलाने फिर्यादीला ५०० रू दिले आरोपीकडे ३६० रू होते बाकी चे पैसे चिल्लर आणण्या करिता फिर्यादी जात असता यातील आरोपीने पाठीमागुन येंवुन त्याच्या हातातले कडयाने डोक्यात मारले व शिविगाळ करू लागला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा १५५ तिवारी हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कोंढाळी** :— अंतर्गत ०१ किमी अंतरावर मौजा वर्धा फाटा कोंढाळी येथे दिनांक २७/२/२०२३ चे २३.४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे— नंदुजी मनोहर किनकर वय ६५ वर्ष, रा. सायखोड कोंढाळी व आरोपी नामे— संजय मधुकर लाडके रा. वडारपुरा कोंढाळी हे सासरे जवाई असुन फिर्यादीचे मुलीचे व आरोपीचे १ वर्षाआधी घटस्फोट झाले असुन नमुद घटना वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीची मुलगी ही सोलार कंपनी मध्ये कामावर जात असता यातील आरोपी हा वर्धा फाटा जवळ जुन्या कारणावरून हातात लोखंडी रॉड घेवुन फिर्यादीच्या मुलीला त्याने रस्त्यावर अडवले व फिर्यादीच्या मुलीला अश्लील शिवीगाळ करू लागला तेव्हा फिर्यादीने आरोपीस हटकले असता आरोपी यांने फिर्यादीला विनाकारण मारहान करून शिवीगाळ करून पाहुन घेण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोना गजानन तितरे ब.न. २०९७ पोस्टे कोंढाळी हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**